दि.२८.०९.२००९ रोजी कोपेला ता.सिरोंचा, जि.गडचिरोली येथे तसेच दि.२७.०५.२०१० रोजी गडचिरोली जिल्ह्यातील गिलनगुडा गावाजवळ त्याचप्रमाणे दि.२९.११.२०१० रोजी जारावंडी (जुनी वस्ती) येथे नक्षलवादी हल्ल्यात शहिद झालेले पोलीस शिपाई यांच्या कुटुंबियांना विशेष मदत व इतर सवलती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक:- पीडब्ल्यूएफ ०४११/प्र.क्र.१६४-अ /पोल-७,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- ३१ मे, २०११

वाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७, दिनांक १६ मार्च, २००५

२) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७, दिनांक ६ जुलै, २००५

३) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-०२०९/प्र.क्र.१०७/पोल-७, दिनांक ६ फेब्रुवारी, २००९

४) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-०८०९/प्र.क्र.६१८ /पोल-७, दिनांक ९ ऑक्टोबर, २००९

५) शासननिर्णय, महसूल व वन विभाग(मदतवपुनर्वसन).क्र. -डिएमयु-२००८/प्र.क्र.३९९/ डीएम-१, दि.१ डिसेंबर, २००८.

६) पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.प्रोमसं/२८-अे/सा.अ.(नु.भ.)-शहिद /४४/२०११, दि.२४.३.२०११

शासन निर्णय :-

नक्षलविरोधी कारवाईत/नक्षलवादी हल्ल्यात मृत झालेल्या पोलीस अधिकारी यांच्या कुटुंबियांना संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये रु.२५.०० लक्ष सानुग्रह अनुदान तसेच मोफत सदनिकेऐवजी रोख रक्कम देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. तदनूषंगाने दि.२८.०९.२००९ रोजी कोपेला ता.सिरोंचा, जि.गडचिरोली येथे नक्षलवादी हल्ल्यात शहिद झालेले पोलीस शिपाई दिवंगत नागेश पापय्या पायाम तसेच दि.२७.०५.२०१० रोजी गडचिरोली जिल्हयातील गिलनगुडा गावाजवळ नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात शहिद झालेले तुषार बंडेवार व बालाजी विठ्ठलराव भोसले त्याचप्रमाणे दि.२९.११.२०१० रोजी जारावंडी (जुनी वस्ती) येथे नक्षलवाद्यांनी केलेल्या गोळीबारात शहिद झालेले चंदरु फकीरा पेंयल्ला या चार पोलीस शिपायांच्या कुटुंबियांना शासन निर्णयातील तरतुदीन्वये प्रत्येकी रु.२५.०० लाख सानुग्रह अनुदान तसेच त्यांना अनुज्ञेय ७५० चौ.फु. क्षेत्रफळाच्या सदनिकेऐवजी रु.३,०००/- प्रति चौ.फु.दराने एकुण रुपये २२,५०,०००/- असे प्रत्येकी एकुण रु.४७,५०,०००/- प्रमाणे येणा-या रु.१९०.०० लक्ष इतक्या खर्चास या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे.

२. याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११२, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(०७) (०४) कर्तव्य बजावित असतांना जखमी झालेल्या पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून तो सन २०११-१२ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या खर्चासाठी पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. अ) संबंधित मृत कर्मचारी विवाहीत असल्यास,पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी, मंजूर करण्यात आलेले सानुग्रह अनुदान रु.२५.०० लक्षचा निधी संबंधीत मृत कर्मचा-याची पत्नी मुले या सावत्र मुले आणि दत्तक मुले, अविवाहीत मुली,सावत्र व दत्तक मुली यांच्या नावे स्वतंत्र खाती काढून समप्रमाणात मुदत ठेवीवर जमा करावेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील कलम ११२ अन्वये प्रदान करण्यात येणा-या उपदानाप्रमाणे जर वरील पैकी त्यांच्या कुटुंबातील एकही व्यक्ती हयात नसतील तर विधवा मुली (सावत्र, दत्तक मुली), आई वडील,१८ वर्षाखालील भाऊ यात सावत्र भाऊ, अविवाहीत बहीण, विधवा बहीण यात सावत्र बहिणी तसेच विवाहीत मुली आणि पूर्वी मृत्यु पावलेल्या मुलांचे अपत्य एक किंवा त्याहून अधिक व्यक्ती हयात असतील तर अशा सर्व व्यक्तींना समान हिश्यात मुदत ठेवीवर जमा करावा व व्याजाकरिता त्यांची वैयक्तिक स्वतंत्र खाती उघडावीत जेणेकरुन मुदत ठेवीवरील व्याज संबंधितांना उपलब्ध होऊ शकेल. या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

ब) तसेच सदनिकेऐवजी प्रत्येकी रु. २२.५० लक्ष इतकी रक्कम देखील वर नमूद केलेल्या परिच्छेद ४ अ मधील पध्दतीनुसार संबंधितांना देण्यात यावी.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३०८/११/व्यय-७ दि.६.४.२०११ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि.शा.घाटगे)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक, महराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली.
पोलीस अधिक्षक, गडचिरोली
महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सह सचिव अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.
पीयुडी-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

[illegible]

शासन निर्णय क्र. पीडब्ल्युएफ ०४११/प्र क्र १६४ अ/पोल-७, दि.३१ मे, २०११ सोबतचे

## "विवरणपत्र"

| अ.क्र | नांव | घटनेचा दिनांक | जखमी/शहीद | सानुग्रह अनुदान | सदनिकेच्या बदल्यात द्यावयाची रक्कम | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागेश पापय्या पायाम, पो.शि | २८.९.२००९ | शहीद | २५,००,०००/- | २२.५०.०००/- | ४७.५०,०००/- |
| २ | तुषार बंडेवार.पो.शि | २७.५.२०१० | शहीद | २५,००,०००/- | २२.५०.०००/- | ४७.५०,०००/- |
| ३ | बालाजी विठ्ठलराव भोसले,पो.शि | २७.५.२०१० | शहीद | २५,००,०००/- | २२.५०.०००/- | ४७.५०,०००/- |
| ४ | चंदरु फकीरा पेयल्ला,पो.शि | २९.११.२०१० | शहीद | २५,००,०००/- | २२.५०.०००/- | ४७.५०,०००/- |
| | | | एकुण - | | | १,९०,००,०००/- |

दि.०८.०४.२०११ रोजी गडचिरोली जिल्ह्यातील मौ.कांदोळी जंगल परिसर येथे तसेच दि.१९.०५.२०११ रोजी ताडगाव जंगल परिसर व नारगुंडा ते हलवेर जंगल परिसर येथे शहिद झालेल्या तीन पोलीस शिपाई यांच्या कुटुंबियांना विशेष मदत व इतर सवलती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक:- पूरक ०६११/प्र.क्र.३६५ /पोल-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- २८ सप्टेंबर, २०११

वाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-०२०९/प्र.क्र.१०५/पोल-५, दिनांक ६ फेब्रुवारी, २००९

२) पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२८-डो/४९३७/पोकनि (अंदाजपत्रक) २३४/२०१०, दि.२०.०६.२०११

३) पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचे पत्र क्र.डी-१२/जखमी नुकसानभरपाई/२९८२/२०११, दिनांक ९.४.२०११

४) पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचे पत्र क्र.डी-१२/जखमी नुकसान भरपाई/२१९०/२०११, दिनांक २०.५.२०११

**शासन निर्णय :-**

नक्षलविरोधी कारवाईत/नक्षलवादी हल्ल्यात मृत झालेल्या पोलीस अधिकारी यांच्या कुटुंबियांना संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये रु.२५.०० लक्ष सानुग्रह अनुदान तसेच मोफत सदनिकेऐवजी रोख रक्कम देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. तदनुषंगाने दि.०८.०४.२०११ रोजी गडचिरोली जिल्ह्यातील मौ.कांदोळी जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान राबविताना बंदुकधारी नक्षलवाद्यांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात शहिद झालेले पोशि/२९८२ धनंजय पंढरी मरके तसेच दि.१९.०५.२०११ रोजी ताडगाव जंगल परिसरात रोड ओपनिंग अभियानालगत कार्यरत असताना बंदुकधारी नक्षलवाद्यांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात शहिद झालेले पोशि/३०७२ मुन्नी चुक्कु पुंगाटी, त्याचप्रमाणे नारगुंडा ते हलवेर जंगल परिसर येथे नक्षलविरोधी अभियान राबविताना बंदुकधारी नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहिद झालेले नापोशि/२१९० चिन्ना मिल्ला वेंढा या तीन पोलीस शिपायांच्या कुटुंबियांना शासन निर्णयातील तरतुदीन्वये प्रत्येकी रु.२५.०० लाख सानुग्रह अनुदान तसेच त्यांना अनुज्ञेय ७५० चौ.फु. क्षेत्रफळाच्या सदनिकेऐवजी रु.३,०००/- प्रति चौ.फु.दराने एकुण रुपये २२,५०,०००/- असे प्रत्येकी एकुण रु.४७,५०,०००/- याप्रमाणे एकुण तीन शहिदांकरीता येणा-या रु.१४२.५० लक्ष (अक्षरी रुपये एकशे बेचाळीस लक्ष पन्नास हजार फक्त) इतक्या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

२. याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावतांना जखमी झालेल्या पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ,०२९३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या

लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून तो जुलै, २०११ च्या पावसाळी अधिवेशनात, सन २०११-१२ करीता पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या रु.२५०.०० लक्ष अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या खर्चासाठी पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. अ) संबंधित मृत कर्मचारी विवाहीत असल्यास,पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी, मंजूर करण्यात आलेले सानुग्रह अनुदान रु.२५.०० लक्षचा निधी संबंधीत मृत कर्मचा-याची पत्नी मुले वा सावत्र मुले आणि दत्तक मुले, अविवाहीत मुली,सावत्र व दत्तक मुली यांच्या नावे स्वतंत्र खाती काढून समप्रमाणात मुदत ठेवीवर जमा करावेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील कलम ११२ अन्वये प्रदान करण्यात येणा-या उपदानाप्रमाणे जर वरील पैकी त्यांच्या कुटुंबातील एकही व्यक्ती हयात नसतील तर विधवा मुली (सावत्र, दत्तक मुली), आई वडील,१८ वर्षाखालील भाऊ यात सावत्र भाऊ, अविवाहीत बहीण, विधवा बहीण यात सावत्र बहिणी तसेच विवाहीत मुली आणि पूर्वी मृत्यु पावलेल्या मुलांचे अपत्य एक किंवा त्याहून अधिक व्यक्ती हयात असतील तर अशा सर्व व्यक्तींना समान हिश्यात मुदत ठेवीवर जमा करावा व व्याजाकरिता त्यांची वैयक्तिक स्वतंत्र खाती उघडावीत जेणेकरुन मुदत ठेवीवरील व्याज संबंधितांना उपलब्ध होऊ शकेल. या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

ब) तसेच सदनिकेऐवजी प्रत्येकी रु. २२.५० लक्ष इतकी रक्कम देखील वर नमूद केलेल्या परिच्छेद ४ अ मधील पध्दतीनुसार संबंधितांना देण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३८९/११/व्यय-७ दि.३०.०६.२०११ व अनौपचारिक संदर्भ क्र.८७६/अर्थ-११, दिनांक ५.७.२०११ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली.
पोलीस अधिक्षक, गडचिरोली
महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सह सचिव अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.
डीपुडी-२ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती (पोल-५).

शहिदांच्या आईवडीलांना रु.५.०० लक्ष
इतक्या रकमेचे सानुग्रह अनुदान देणेबाबत

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक:- विसआ ०४०९/१२२७/प्र.क्र.३४३/पोल-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- १० ऑक्टोबर, २०११

**प्रस्तावना**

दिनांक २६.११.२००८ रोजी मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यात शहिद झालेले पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलविरोधी अभियानावर कार्यरत असतांना बॉम्बस्फोट, भूसुरुंग स्फोट, प्रत्यक्ष चकमक इ.मध्ये शहिद झालेल्या पोलीस अधिकारी /कर्मचारी यांच्या कुटुंबियांना रु.२५.०० लक्ष सानुग्रह अनुदान व इतर सोयी सवलती शासनाने त्या-त्या वेळी देऊ केल्या आहेत. तथापि, सदर सानुग्रह अनुदान हे बहुतांशी प्रकरणी शहिदांच्या पत्नीस मिळालेले आहे. अशा काही प्रकरणी शहिदांचे आईवडील विभक्तपणे खेडोपाडयात राहत आहेत. शहिद पोलीस अधिकारी/कर्मचारी जिवंत असेपर्यंत आईवडीलांना वेळोवेळी आर्थिक सहाय्य करत असावेत. परंतु, त्यांचा मृत्यु झाल्यानंतर ती जबाबदारी शहिदांची पत्नी पार पाडत नसल्यामुळे शहिदांच्या आईवडीलांना त्यांच्या वृध्दपकाळाची चिंता वाटत आहे. तसेच भितीही वाटत आहे. काही प्रकरणी शहिदांचे आईवडील अत्यंत दयनिय परिस्थीतीत झोपडपट्टीत राहत असून काही प्रकरणी मुलगा व सून शहरात राहतात व आईवडील खेडोपाड्यात राहतात. काही ठिकाणी खेडोपाडयातील आईवडील, रोजगार हमी योजनेवर रोजंदारीवर मोलमजूरीकरीता जात असल्याचे चित्र दिसून आले आहे. या सर्व बाबींचा विचार करुन ज्या शहिद पोलीस कर्मचा-यांचे आईवडील खेडोपाड्यात विभक्तपणे राहत आहेत तसेच ज्या शहिद पोलीस कर्मचा-यांचे आईवडील दयनिय परिस्थीतीत जीवन कंठीत आहेत अशा शहिदांच्या आईवडीलांना रु.५.०० लक्ष देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासन पुढील निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन, ज्या शहिद पोलीस कर्मचा-यांचे आईवडील खेडोपाड्यात विभक्तपणे राहत आहेत, तसेच ज्या शहिद पोलीस कर्मचा-यांचे आईवडील दयनिय परिस्थीतीत जीवन कंठीत आहेत, अशा शहिदांच्या आईवडीलांना, त्यांच्या वृध्दपकाळात त्यांना आर्थिक सहाय्य करुन त्यांचे जीवन काही प्रमाणात सुसह्य करण्याकरीता, प्रत्येकी रु.५.०० लक्ष याप्रमाणे एकुण ३० शहिदांच्या आईवडीलांना सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे सानुग्रह अनुदानाकरीता एकुण रु.१.५० कोटी (रुपये एक कोटी पन्नास लक्ष फक्त) इतक्या खर्चास खालील अटींच्या अधीन राहून मंजुरी देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय [illegible]

ब) शहिदांच्या आईवडीलांना यापूर्वी इतर कोणतेही सानुग्रह अनुदान मिळालेले असेल तर सदरहू सानुग्रह अनुदान देय असणार नाही.

क) शहिदांचे आईवडील कुटुंबापासून विभक्त राहत आहेत याची पुन्हा पडताळणी करण्यात यावी.

२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयातील विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांना नियंत्रक अधिकारी आणि पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहायक (लेखा) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावितांना जखमी झालेल्या पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून तो जुलै, २०११ च्या पावसाळी अधीवेशनात, सन २०११-१२ करीता पूरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातुन भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३७४/११/व्यय-७ दि.२२.६.२०११ व ८७७/अर्थ-११, दिनांक ०४.०७.२०११ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.शा.घाटगे)

कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक, महराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई

पोलीस अधिक्षक, गडचिरोली

महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.

संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

उप सचिव, अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.

अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.

वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.

बीयुडी-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

निवड नस्ती (पोल-८).

**शासन निर्णय, गृह विभाग क्र.विसआ-०४०१/१२२७/प्र.क्र-३४३/पोल-७, दि.१७ऑक्टोबर, २०११**

**प्रपत्र**

**दि. २६/११/२००८ रोजी मुंबईवरील अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या आईवडिलांचा तपशिल व त्यांना अनुज्ञेय सानुग्रह अनुदान**

| अ.क्र | शहीद अधिकारी/ कर्मचा-यांचे नाव | आईवडीलांचे नाव | शहीदांचे आईवडील राहत असलेला पत्ता | सानुग्रह अनुदान (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | अशोक कामटे अपर पोलीस आयुक्त पुप्राचि | वडील - श्री.मारुतराव नारायणराव कामटे आई - श्रीमती मारुतराव कामटे | १४, रक्षक सोसायटी, पिंपळे निलख, औंध कॅम्प, पुणे - २७ | ५.०० |
| २ | विजय सहदेव साळसकर, पोलीस निरीक्षक/गुन्हे शाखा | आई - हेमलता सहदेव साळसकर | डी/१०१ क्षीरजगंगा, चिंचोली बंदर रोड, मालाड (पश्चिम)मुंबई. | ५.०० |
| ३ | प्रकाश पांडूरंग मोरे, पोलीस उप निरीक्षक/एल टी मार्ग | वडील - पांडूरंग धोंडबाराव मोरे आई - रुक्मिणी पांडूरंग मोरे | एल/१८, दिनदयाल नगर, नवघर रोड मुलुंड (पश्चिम) मुंबई | ५.०० |
| ४ | बापुराव साहेबराव धुरगुडे पो.उप.नि./स.पो.१ | वडील- साहेबराव मल्हारी धुरगुडे आई- श्रीमती बनाबाई साहेबराव धुरगुडे | मु.बिरडाचीवाडी पो.भुईंज, ता.वाई जि.सातारा | ५.०० |
| ५ | अरुण रघुनाथ चित्ते पोशि क्र- ३४००८/मो.प.वि. | आई - बिमलाबाई रघुनाथ चित्ते | मु.पो.विरगाव, ता.सटाणा जि.नाशिक | ५.०० |
| ६ | विजय मधुकर खांडेकर पो.शि.३०२०१/आझाद मैदान | वडील - मधुकर खांडेकर आई - निर्मला मधुकर खांडेकर | सी/२०१०, पोलीस मोटर परिवहन विभाग, शेकर्ड रोड, नागपाडा, मुंबई. | ५.०० |
| ७ | जयवंत हनुमंत पाटील पोशि/२९१८० स.पो.१ | वडील-हनुमंत कृष्णा पाटील आई-शकुंतला हनुमंत पाटील | मु.पो. कडेगांव ता.वाई जि.सातारा | ५.०० |
| ८ | अंबादास रामचंद्र पवार पोशि /०५-६३/संरक्षण-१ | आई-कमल रामचंद्र पवार | मु.पो.कडेगाव, ता.वाई, जि.सातारा | ५.०० |
| ९ | शशांक चंद्रसेन शिंदे पो.नि | वडील चंद्रसेन राजाराम शिंदे आई-लक्ष्मीबाई चंद्रसेन शिंदे | मु.पो.रिक्टोली ता. चिपळून जि. रत्नागिरी | ५.०० |
| १० | मुकेश भिकाजी जाधव १९३ - ए परिमंडळ | वडील - भिकाजी लखु जाधव आई- सुलोचना भिकाजी जाधव | नेहरु नगर नं.२ झोपडपट्टी, सायन कोळीवाडा, हेमंत मांजरेकर मार्ग, मुंबई - ४०० ०३७ | ५.०० |



(Signature) १७/१०/२०११

**दिनांक १/२/२००९ रोजी मौजा मरकेगांव जंगल परिसरात झालेल्या चकमकीमध्ये शहीद झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे नामनिर्देशित वारस व त्यांना मिळालेल्या शासकीय रकमा**

| अ.क्र | शहीद अधिकारी कर्मचा-यांचे नांव | आईवडीलांचे नांव | शहीदांचे आईवडील राहत असलेला पत्ता | सानुग्रह अनुदान (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|
| ११ | नापोशि/३६४ बैसाकु जगतराम पडोटी | वडील-जगतराम महानसिंग पडोटी | मु.पो. सोनपूर ता. कोरची, जि. गडचिरोली | ५.०० |
| १२ | नापोशि/१९६९ नानु उलगे तुलावी | आई- दसुबाई उलगे तुलावी | मु.रानवाही पो. मालेवाडा, ता.कुरखेडा, जि. गडचिरोली | ५.०० |
| १३ | पोशि/२००७ रुपेश जनार्धन पेंदोर | वडील- जार्धन जि. पेंदोर आई दुर्शाता जनार्धन पेंदोर | मु.पो.रेगडी ता. चामोर्शी जि.गडचिरोली | ५.०० |

**दिनांक ६/४/२००९ रोजी मौजा मुंगनेर चकमकीत शहीद पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे नामनिर्देशित वारस व त्यांना मिळालेल्या शासकीय रकमा**

| अ.क्र | शहीद अधिकारी/ कर्मचा-यांचे नांव | आईवडीलांचे नांव | शहीदांचे आईवडील राहत असलेला पत्ता | सानुग्रह अनुदान (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|
| १४ | पोशि/२७०१ कालिदास रुषी वड्डे | वडील-रुषी विठोबा वड्डे आई-कासाबाई रुषी वड्डे | मु.पो.रांगी, ता.धानोरा, जि. गडचिरोली | ५.०० |
| १५ | पोशि/२७८५ ज्ञानेश्वर भगवान शेप | वडील-भगवान विनायक शेप आई-राधाबाई भगवान शेप | रा.मोहा, ता. परळी(वै)जि.बीड | ५.०० |

**दिनांक २१/५/२००९ रोजी हत्तीगोटा पहाडी जंगलात झालेल्या चकमकीत शहीद पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे नामनिर्देशित वारस व त्यांना मिळालेल्या शासकीय रकमा**

| अ.क्र | शहीद अधिकारी/ कर्मचा-यांचे नांव | आईवडीलांचे नांव | शहीदांचे आईवडील राहत असलेला पत्ता | सानुग्रह अनुदान (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|
| १६ | पोनि/ अशोक रामास्वामी अय्यर | आई-श्रीमती विद्याबाई रामास्वामी अय्यर | मु.पो.दर्डानगर ता.जि.यवतमाळ | ५.०० |
| १७ | पोउपनि/ शांताराम प्रतापराव घोरपडे | वडील-प्रतापराव आनंदराव घोरपडे आई-सौ.विमल प्रतापराव घोरपडे | मु.पो.वेणेगाव ता.जि.सातारा | ५.०० |
| १८ | पोहवा/२४७ हेमराज पत्रुजी टेंभुर्णे | वडील-पत्रुजी माधव टेंभुर्णे आई- वत्सला पत्रुजी टेंभुर्णे | मु.पो.गोगाव ता.जि.गडचिरोली | ५.०० |
| १९ | पोहवा/५०५ सुरेश अवसुजी किरंगे | आई-गं.भा.निर्मला अवसुजी किरंगे | मु.पो.सोळे ता.धानोरा जि.गडचिरोली | ५.०० |

D:\Note 2011\shahid table.wp

(स्वाक्षरी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | नापोशि/८२३<br>काशीराम वासुदेव रोहनकर | वडील-वासुदेव सखाराम रोहनकर<br>आई- सौ.पार्वताबाई वासुदेव रोहनकर | मु.पो.वाकडी<br>ता.जि.गडचिरोली | ५.०० |
| २१ | पोशि/१२४४<br>सदानंद वासुदेव मडावी | वडील-वासुदेव शिवराम सदानंद मडावी<br>आई-सौ.सरस्वती वासुदेव मडावी | मु.पो.नवरगाव<br>ता.कुरखेडा जि. गडचिरोली | ५.०० |
| २२ | मनापोशि/१७८३<br>शोभा लिंगाजी ताडे | आई-गं.भा.वारलूबाई लिं.ताडे | मु.पो.महागाव ता.अहेरी<br>जि. गडचिरोली | ५.०० |
| २३ | मनापोशि/१८०६<br>गेंदकुंवर चैनसिंग फरदिया | आई-गं.भा.गनसीरबाई चैनसिंग फरदिया | मु.पो.तुमडीकसा<br>ता.धानोरा.जि. गडचिरोली | ५.०० |
| २४ | मनापोशि/१८९२<br>शकुंतला लच्च्या आलाम | वडील-लच्च्या पोचम आलाम | मु.पो.अहेरी ता अहेरी,<br>जि. गडचिरोली | ५.०० |
| २५ | पोशि/२१६१<br>संतोष बन्सी दुर्गे | वडील- बन्सी तुकाराम दुर्गे<br>आई-सौ.ताराबाई बन्सी दुर्गे | मु.पो.मलेझरी<br>ता.मुलचेरा, जि. गडचिरोली | ५.०० |
| २६ | पोशि/२२२०<br>विलास वासुदेव मांदाळे | आई-सौ.कौशल्याबाई वासुदेव मांदाळे | मु.दिभना<br>पो.जेप्रा.ता.जि.गडचिरोली | ५.०० |
| २७ | मपोशि/२३८५<br>अल्का बाजोजी गावळे | वडील-बाजोजी धिराजी गावडे | मु.पो.वडेगाव ता.कुरखेडा<br>जि.गडचिरोली | ५.०० |

**दिनांक ८/१०/२००९ रोजी मौजा लाहेरी जंगल परिसरात झालेल्या चकमकीमध्ये शहीद झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे नामनिर्देशित वारस व त्यांना मिळालेल्या शासकीय रकमा**

| अ.क्र | शहीद अधिकारी/ कर्मचा-यांचे नांव | आईवडीलांचे नांव | शहीदांचे आईवडील राहत असलेला पत्ता | सानुग्रह अनुदान (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|
| २८ | पोशि/३१९<br>धनराज बाजीराव धोटे | वडील-बाजीराव तुकाराम धोटे | मु.पो.नवेगाव<br>ता.जि.गडचिरोली | ५.०० |
| २९ | पोशि/११३२<br>शंकर बुधाजी आत्राम | वडील-बुधाजी सोम्या आत्राम | मु.पो.लाहेरी ता.भामरागड<br>जि. गडचिरोली | ५.०० |
| ३० | पोशि/१४६४ | वडील-रमेश समय्या वासनवार | मु.पो.ता.एटापल्ली<br>जि.गडचिरोली | ५.०० |

(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग

------------

शहिदांच्या कुटुंबियांना दि.०६.०२.२००९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात येत असलेल्या रु.२५.०० लक्ष सानुग्रह अनुदानातून शहिदांच्या आईवडीलांना रु.५.०० लक्ष सानुग्रह अनुदान देणेबाबत

11 JAN 2012

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
### शासन पुरकपत्र क्रमांक: पीडब्ल्युएफ २०११/प्र.क्र.५४९/पोल-७

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- ०९ जानेवारी, २०१२.

**वाचा :-** १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक- पीडब्ल्युएफ ०२०९/प्र.क्र.१०७/पोल-७, दि. ०६.०२.२००९

**प्रस्तावना :** अतिरेकी / नक्षलवादी कारवाईत बॉम्ब स्फोट, भूसुरुंग स्फोट, प्रत्यक्ष चकमक इ.मध्ये शहिद झालेल्या पोलीस अधिकारी /कर्मचारी यांच्या कुटुंबियाना संदर्भीय दिनांक ०६.०२.२००९ च्या शासन निर्णयान्वये रु.२५.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. तथापि, सदर अनुदान हे बहुतांश प्रकरणी शहिदांच्या पत्नीस मिळत असल्यामुळे शहिदांचे आईवडील यापासून वंचित रहात आहेत. काही प्रकरणी शहिदांचे आईवडील खेडोपाडयात विभक्तपणे रहात आहेत. शहिद पोलीस अधिकारी / कर्मचारी जिवंत असेपर्यंत त्यांना वेळोवेळी आर्थीक सहाय्य करीत असावेत. परंतु त्यांच्या मृत्युनंतर ती जबाबदारी शहिदांची पत्नी पार पाडत नसल्यामुळे शहिदांच्या आईवडीलांना त्यांच्या वृध्दापकाळाची चिंता तसेच भितीही वाटत आहे. अशा काही प्रकरणी वृध्द आईवडीलांना रोजगार हमी योजनेवर मोलमजूरीकरीता जावे लागत असल्याचे चित्र दिसून आले आहे. यासर्व बाबींचा विचार करुन नक्षलवादी / अतिरेकी कारवाईत शहिद झालेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटूंबियाना देय असलेल्या रुपये २५.०० लक्ष अनुदानातून रुपये ५.०० लक्ष इतके अनुदान शहीदांच्या आईवडीलांना मंजूर करण्याचीबाब तसेच सदर रक्कम त्यांना खर्च करण्याकरिता तातडीने उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-** उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन नक्षलवादी / अतिरेकी कारवाईत शहिद झालेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटुंबियाना देय असलेल्या रुपये २५.०० लक्ष अनुदानातून रुपये ५.०० लक्ष इतके अनुदान ठोक रकमेच्या स्वरुपात शहीदांच्या आईवडीलांना पुढील अटीच्या अधिन मंजूर करण्यात येत आहे.

१) शहिदांचे आईवडील हयात नसल्यास अनुदानाची संपूर्ण रक्कम संदर्भिय शासन निर्णय दिनांक ०६/०२/२००९ मध्ये नमुद केलेल्या विहित कार्यपध्दती नुसार शहिदाच्या पत्नीस देण्यात यावी.

२) शहिद पोलीस अधिकारी / कर्मचारी अविवाहित असल्यास व अनुदानाची रक्कम संपूर्ण रक्कम रुपये २५.०० लक्ष वारसाहक्काने त्यांच्या आईवडीलांना मिळत असल्यास वेगळ्याने रुपये ५.०० लक्ष देण्याची आवश्यकता नाही. रुपये २५.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्याबाबतची कार्यवाही दिनांक ०६/०२/२००९ च्या शासन निर्णयात नमुद केल्यानुसार करण्यात यावी.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयातील विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांना नियंत्रक अधिकारी आणि पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहायक (लेखा) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण- (००) (०४) कर्तव्य बजावितांना जखमी झालेल्या पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियाना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२१३) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून तो त्यात्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय हा दिनांक ११ आक्टोबर, २०११ पासुन अंमलात राहील.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.६३६/व्यय-७ दिनांक १४.१२.२०११ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(दि.शा.घाटगे)**
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

मा.मंत्री (गृह) महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (गृह), महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव, (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षलवाद विरोधी अभियान, नागपूर.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
सर्व पोलीस आयुक्त.
महासमादेशक, गृह रक्षक दल, मुंबई .
सर्व पोलीस अधिक्षक
सर्व सह सचिव/ उप सचिव, गृह विभाग
अधिदान व लेखा अधिकारी, (रोख शाखेमार्फत )
प्रधान महालेखापाल-१ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई .
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१०/व्यय/अर्थोपाय कार्यासन) मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (पोल-७).गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

गुन्हेगार, समाजकंटक इत्यादी समाजविघातक शक्तिविरुध्द कारवाई करतांना मृत्यु पावलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक:- पीडब्ल्यूएफ ०८११/प्र.क्र.४५३ /पोल-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- १२ एप्रिल, २०१२

वाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक- पीडब्ल्यूएफ ०१९५/सी.आर.१३१ /पोल-७, दिनांक १३ मार्च, १९९६.

२) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्युएफ १००३/प्र.क्र.८/पोल-७, दिनांक १६ मार्च, २००५

३) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्युएफ १००८/प्र.क्र.८/पोल-७, दिनांक २९ नोव्हेंबर, २००८

४) शासन निर्णय , गृह विभाग, क्रमांक:- पीडब्ल्यूएफ ०८११/प्र.क्र.४५३ /पोल-७, दि.२८ फेब्रुवारी, २०१२

५) शासन निर्णय, गृह विभाग,क्रमांक:- पीडब्ल्यूएफ ०८११/प्र.क्र.४५३ /पोल-७, दि. ७ मार्च, २०१२

**प्रस्तावना :-**

उपरोक्त दिनांक १३ मार्च, १९९६ च्या शासन निर्णयान्वये नक्षलवादी, अतिरेकी यांच्या विरुध्दच्या कारवाईत मृत्यु पावलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटुंबियांना दिल्या जाणा-या रकमेत रु.१.०० लाखावरुन रु.२.०० लक्ष एवढी वाढ करण्यात आली होती. तसेच ही रु.२.०० लक्षची नुकसान भरपाईची रक्कम गुन्हेगार, समाजकंटक, संघटीत गुन्हेगार इत्यादी समाजविघातक शक्तिविरुध्द कारवाई करतांना मृत्यु पावलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटुंबियांनाही देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला होता. तद्नंतरच्या काळात नक्षलवादी, अतिरेकी दरोडेखोरी, संघटीत गुन्हेगारी विरुध्दच्या कारवाईत व आपत्कालीन काळात मदत करतांना मृत पावलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटुंबियांना तसेच जखमी झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचा-यांना देण्यात येणा-या नुकसान भरपाईच्या रकमेत तसेच सोयी सुविधेमध्ये दिनांक १६ मार्च, २००५ व दिनांक २९ नोव्हेंबर, २००८ च्या शासन निर्णयान्वये वाढ करण्यात आलेली आहे. तथापि, गुन्हेगार, समाजकंटक इत्यादी समाजविघातक शक्तीविरुध्द कारवाई करतांना मृत्यु पावलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटुंबियांना देण्यात येत असलेल्या रु.२.०० लक्ष इतक्या नुकसान भरपाईमध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नसल्यामुळे उपरोक्त संदर्भिय दिनांक दि.२८ फेब्रुवारी, २०१२ च्या शासन निर्णयान्वये सदर रकमेत वाढ करण्यात आली आहे. तसेच, सदर शासन निर्णयाबाबत दि.७ मार्च, २०१२ चे शुध्दीपत्रकही निर्गमित करण्यात आले आहे.

**आता दि.२८ फेब्रुवारी, २०१२ चा शासन निर्णय व दि.७ मार्च, २०१२ चे शुध्दीपत्रक अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.**

**शासन निर्णय :-** या अनुषंगाने **गुन्हेगार, समाजकंटक** इत्यादी समाजविघातक शक्तिविरुध्द कारवाई करतांना मृत्यु पावलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटुंबियांना देण्यात येत असलेल्या रु.२.०० लक्ष इतक्या नुकसान भरपाईमध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्याचा तसेच सदर कारवाईत जखमी अथवा

कायमचे अपंगत्व आलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या नुकसान भरपाई देण्याबाबत खालीलप्रमाणे शासनाने निर्णय घेतलेला आहे.

| अ.क | पदनाम | गुन्हेगार, समाजकंटक, इत्यादी समाजविघातक शक्तिविरुध्द कारवाई करतांना मृत्यु पावलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटुंबियांना द्यावयाची नुकसान भरपाईची रक्कम. | गुन्हेगार, समाजकंटक, इत्यादी समाजविघातक शक्तिविरुध्द कारवाई करतांना कायमचे अपंगत्व आलेल्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना द्यावयाची नुकसान भरपाईची रक्कम. | गुन्हेगार, समाजकंटक इत्यादी समाजविघातक शक्तिविरुध्द कारवाई करतांना जखमी झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना द्यावयाची नुकसान भरपाईची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस शिपाई /पोलीस नाईक | रु.७,५०,०००/- | रु. ३,००,००० | रु. २,००,००० |
| २ | पोलीस हवालदार/ सहाय्यक पोलीस फौजदार | रु.८,००,०००/- | रु. ३,००,००० | रु. २,३०,००० |
| ३ | पोलीस उपनिरीक्षक | रु. ९,००,००० | रु.३,००,०००/- | रु.२,६०,०००/- |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक /पोलीस निरीक्षक वरिष्ठ पोलीस पोलीस निरीक्षक | रु.१०,००,०००/- | रु.३,३०,०००/- | रु.३,००,०००/- |
| ५ | सहाय्यक पोलीस आयुक्त/ पोलीस उपअधिक्षक/पोलीस अधिक्षक/पोलीस उपायुक्त | रु. ११,००,०००/- | रु.३,६०,०००/-- | रु.३,२०,०००/- |
| ६ | अपर पोलीस आयुक्त/पोलीस उपमहानिरीक्षक व त्यावरील दर्जाचे अधिकारी | रु.१२,००,०००/- | रु.३,,६०,०००/- | रु.३,४०,०००/- |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.शा.घाटगे)

कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रत :

पोलीस महासंचालक, महराष्ट्र राज्य, मुंबई.

संचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग (गुन्हे), महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त गुन्हे अन्वेषण विभाग (गुप्तवार्ता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलवादी प्रतिबंधक कारवाया) महाराष्ट्र राज्य, नागपूर
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
प्राचार्य, पोलीस अकादमी, नाशिक
सर्व पोलीस आयुक्त
सर्व पोलीस उप महानिरीक्षक (सर्व परिक्षेत्र, रेल्वे, रा.रा.पो.बल, नागरी हक्क संरक्षण इ.)
सर्व पोलीस अधीक्षक, (जिल्हा, रेल्वे, मोटार परिवहन विभाग पुणे)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल
सर्व प्राचार्य, प्रादेशिक पोलीस प्रशिक्षण शाळा
महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकरी
वित्त विभाग (व्यय-७)
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व सह सचिव / उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
गृह विभाग (कार्यासन पोल-१ ते पोल-१५, विशा-१/अ, विशा-१/ब ते विशा-८, बीयुडी-१)
निवड नस्ती (पोल-७).

गुन्हेगार, समाजकंटक इत्यादी समाजविघातक
शक्तिविरुध्द कारवाई करतांना मृत्यु पावलेल्या
पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या
कुटुंबियांना नुकसान भरपाई देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन पूरकपत्र क्रमांक:- पीडब्ल्यूएफ ०८११/प्र.क्र.४५३ /पोल-७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- २८ मे, २०१२**

**वाचा :-** १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक- पीडब्ल्यूएफ ०८११/प्र.क्र४५३ /पोल-७, दिनांक १२ एप्रील, २०१२

**शासन पूरकपत्र :-** विषयाच्या अनुषंगाने शासन निर्णय,गृह विभाग, क्रमांक- पीडब्ल्यूएफ ०८११/प्र.क्र४५३ /पोल-७, दिनांक १२ एप्रील, २०१२ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयातील दुस-या पानावरील तक्त्यानंतर (टेबलनंतर) खालीलप्रमाणे मजकुर वाचण्यात यावा.

"गुन्हेगार, समाजकंटक यांच्यावरील कार्यवाही हा पोलीसांच्या नैमित्तीक कर्तव्याचा भाग आहे ही बाब विचारात घेता शासन निर्णय, गृह विभाग क्र.पीडब्ल्युएफ १००३/प्र.क्र.८/पोल-७, दिनांक १६/७/२००५ व शासन निर्णय,गृह विभाग क्र. पीडब्ल्यूएफ १००८/प्र.क्र.८/पोल-७, दिनांक २९/११/२००८ मधील इतर अनुज्ञेय बाबी व सानुग्रह अनुदान देय होणार नाही.

पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांना वरीलप्रमाणे नुकसान भरपाई देण्याचा खर्च लेखाशिर्ष "२०५५-पोलीस (००) ११३ पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण (००)(०४) कर्तव्य बजावतांना जखमी झालेल्या पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली टाकण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१३/१२/व्यय-७, दिनांक ९/१/२०१२ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रत

पोलीस महासंचालक, महराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग (गुन्हे), महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त गुन्हे अन्वेषण विभाग (गुप्तवार्ता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलवादी प्रतिबंधक कारवाया) महाराष्ट्र राज्य, नागपुर
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
प्राचार्य, पोलीस अकादमी, नाशिक

सर्व पोलीस आयुक्त
सर्व पोलीस उप महानिरीक्षक (सर्व परिक्षेत्रे, रेल्वे, रा.रा.पो.बल, नागरी हक्क संरक्षण इ.)
सर्व पोलीस अधीक्षक, (जिल्हा, रेल्वे, मोटार परिवहन विभाग पुणे)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल
सर्व प्राचार्य, प्रादेशिक पोलीस प्रशिक्षण शाळा
महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकरी
वित्त विभाग (व्यय-७)
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व सह सचिव / उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
गृह विभाग (कार्यासन पोल-१ ते पोल-१५, विशा-१/अ, विशा-१/ब ते विशा-८, बीयुडी-१)
निवड नस्ती (पोल-७).

0 5 2 10
0 9
84525

दि.२०.०८.२०११ रोजी गडचिरोली जिल्ह्यातील मौ. माकडचुवा परिसर येथे तसेच दि.०१.१२.२०११ रोजी चिचगड पोलीस स्टेशन अंतर्गत धमदीटोला येथे नक्षलवादी हल्ल्यात शहिद झालेल्या दोन पोलीस शिपाई यांच्या कुटुंबियांना विशेष मदत व इतर सवलती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक:- पीडब्ल्युएफ ०३१२/प्र.क्र.१४६ /पोल-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- ३१ मे, २०१२

वाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-०२०९/प्र.क्र.१०७/पोल-७, दिनांक ६ फेब्रुवारी, २००९.
२) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-१०११/प्र.क्र.५४९/पोल-७, दिनांक ९ जानेवारी, २०१२.
३) पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२८-अे/४९३७ /सा.अ.(नु.भ.) -शहिद/४४/२०११, दि.१७.०३.२०१२.
४) पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचे पत्र क्र.डी-१२/जखमी/ नुकसानभरपाई/७९३/ २०११, दिनांक २२.०८.२०११.
५) पोलीस अधीक्षक, गोंदीया यांचे पत्र क्र.कक्ष-पेंशन/लेखा/नुकसा भरपाई/शहिदा/ २०११/८४०८, दिनांक ०३.१२.२०११.

**शासन निर्णय :-**

नक्षलविरोधी कारवाईत/नक्षलवादी हल्ल्यात मृत झालेल्या पोलीस अधिकारी यांच्या कुटुंबियांना संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये रु.२५.०० लक्ष सानुग्रह अनुदान तसेच मोफत सदनिकेऐवजी रोख रक्कम देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. तदनूषंगाने दि.२०.०८.२०११ रोजी गडचिरोली जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचे अधिकार क्षेत्रातील उपविभाग गडचिरोली अंतर्गत पोलीस मदत केंद्र पोटेगाव हद्दीत मौजा माकडचुवा परिसरात, नक्षलविरोधी अभियान राबविताना बंदुकधारी नक्षलवाद्यांनी अग्निशस्त्रातून केलेल्या अंदाधुद गोळीबारात शहिद झालेले पो.हवा./७१३ परदेशी सुकुजी देवांगण तसेच दि.०१.१२.२०११ रोजी पोलीस अधीक्षक, गोंदीया यांच्या अधिकार क्षेत्रातील चिंचगड पोलीस स्टेशन अंतर्गत गणूटोला एओपी येथील धमदीटोला येथे बंदुकधारी नक्षलवाद्यांनी अग्निशस्त्रातून केलेल्या अंदाधुद गोळीबारात शहिद झालेले पो.शि./१७९२ मनोज आत्माराम बिझाडे, या दोन पोलीस शिपायांच्या कुटुंबियांना शासन निर्णयातील तरतूदीन्वये प्रत्येकी रु.२५.०० लाख सानुग्रह अनुदान तसेच त्यांना अनुज्ञेय ७५० चौ.फु. क्षेत्रफळाच्या सदनिकेऐवजी रु.३,०००/- प्रति चौ.फु.दराने एकुण रुपये २२,५०,०००/- असे प्रत्येकी एकुण रु.४७,५०,०००/- याप्रमाणे एकुण दोन शहिदांकरीता येणा-या रु.९५.०० लक्ष (अक्षरी रुपये पंचान्नव लक्ष फक्त) इतक्या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

२. शहिदांच्या कुटुंबियांना मोफत सदनिकेऐवजी रोख रक्कम अदा करण्यात येत असल्यामुळे त्यांना शहिदांच्या सेवानिवृत्तीपर्यंत देय असलेल्या वेतन व भत्यामध्ये घरभाडे भत्ता अदा केला जाणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.

३.        शहिदांच्या कुटुंबियांना उपरोक्त मंजुर रु.२५.०० लक्ष निधीमधून शहिदांच्या आईवडीलांना रु.५.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्याबाबतची कार्यवाही संदर्भीय क्र.२. येथील शासन निर्णय दि.९ जानेवारी, २०१२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे करण्यात यावी.

४.        याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस. (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावताना जखमी झालेल्या पोलीसाना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून सन २०१२-१३ च्या मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

५.        शहिद झालेले पो.हवा./७९३ परदेशी सुकुजी देवांगण यांच्या कुटुंबियांना रु.४७.५० लक्ष इतकी रक्कम अदा करण्याकरीता पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांना त्याचप्रमाणे शहिद झालेले पो.शि./१७९२ मनोज आत्माराम बिझाडे यांच्या कुटुंबियांना रु.४७.५० लक्ष इतकी रक्कम अदा करण्याकरीता पोलीस अधिक्षक, गोंदिया यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६.        अ) संबंधित मृत कर्मचारी विवाहीत असल्यास,पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी, मंजूर करण्यात आलेले सानुग्रह अनुदान रु.२५.०० लक्षाचा निधी संबंधीत मृत कर्मचा-याची पत्नी मुले वा सावत्र मुले आणि दत्तक मुले, अविवाहीत मुली,सावत्र व दत्तक मुली यांच्या नावे स्वतंत्र खाती काढून समप्रमाणात मुदत ठेवीवर जमा करावेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील कलम ११२ अन्वये प्रदान करण्यात येणा-या उपदानाप्रमाणे जर वरील पैकी त्यांच्या कुटुंबातील एकही व्यक्ती हयात नसतील तर विधवा मुली (सावत्र, दत्तक मुली), आई वडील,१८ वर्षाखालील भाऊ यात सावत्र भाऊ, अविवाहीत बहीण, विधवा बहीण यात सावत्र बहिणी तसेच विवाहीत मुली आणि पूर्वी मृत्यु पावलेल्या मुलांचे अपत्य एक किंवा त्याहून अधिक व्यक्ती हयात असतील तर अशा सर्व व्यक्तींना समान हिश्यात मुदत ठेवीवर जमा करावा व व्याजाकरिता त्यांची वैयक्तिक स्वतंत्र खाती उघडावीत जेणेकरुन मुदत ठेवीवरील व्याज संबंधितांना उपलब्ध होऊ शकेल. या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

ब) तसेच सदनिकेऐवजी प्रत्येकी रु. २२.५० लक्ष इतकी रक्कम देखील वर नमूद केलेल्या परिच्छेद ६ अ मधील पध्दतीनुसार संबंधितांना देण्यात यावी.

७.        सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२१९/१२/व्यय-७ दि.०९.०४.२०१२ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.शा.घाटगे)

कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक, महराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली.

पोलीस अधिक्षक, गडचिरोली / पोलीस अधिक्षक, गोंदीया

महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.

संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सह सचिव अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२

जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली/गोंदीया

वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.

पोल-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२/निवड नस्ती (पोल-५)